महानिर्मिती

जाहीर सूचना

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि २०२३-२४ चे अंतिम समायोजन; आर्थिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक कामगिरी आढावा व तात्पुरते समायोजन आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० करिता एकूण महसुलाची आवश्यकता व वीजदर याच्या मंजुरीकरिता सादर केलेल्या बहुवार्षिक याचिकेवर (प्रकरण क्रमांक १८७/२०२४)

सूचना/अभिप्राय मागवणेबाबत.

१) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम (बहुवार्षिक वीजदर) २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि २०२३-२४ चे अंतिम समायोजन; आर्थिक वर्ष २०२४-२५ ची एकूण महसुलाची आवश्यकता व तात्पुरत्या समायोजनासाठी आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोग (बहुवार्षिक वीजदर) विनियम २०२४ नुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठी एकूण महसुलाची आवश्यकता आणि वीजदर याकरिता याचिका दाखल केली आहे.

२) मा. आयोगाने हि याचिका १० डिसेंबर २०२४ रोजी दाखल करून विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४ (२) च्या अंतर्गत महानिर्मितीने जाहीर सूचना प्रसिद्ध करावी व याचिकेवर अभिप्राय / हरकती मागवाव्यात असे निर्देश दिले आहेत.

३) याचिकेतील ठळक मुद्दे, यामधील आयोगाने मंजूर केलेले आकडे प्रकरण क्र. २२७/२०२२ च्या आदेशानुसार घेतलेले आहेत.

तक्ता क्र. १: आ.व. २०२२-२३, आ.व. २०२३-२४ आणि २०२४-२५ करीता औष्णिक विद्युत केंद्राचे कामगिरी घटक (एकत्रित)

तपशील	आ.व. २०२२-२३		आ.व. २०२३-२४		आ.व. २०२४-२५	
	मंजूर केलेले	प्रत्यक्ष	मंजूर केलेले	प्रत्यक्ष	मंजूर केलेले	प्रत्यक्ष
उपलब्धता (%)	८३.३८	६३.९७	८३.३८	७०.२८	८३.३८	७१.१७
सयंत्र भारांक (%)	६९.०७	५८.७७	७४.५२	६३.२८	७४.५२	७१.१७
एकूण वीजनिर्मिती (द.ल.यु)	६१,७८४.६०	५३,१३६.५३	६६,८५०.३८	५७,४३९.२३	६६,६६७.७३	६३,६७०.९०
निव्वळ वीजनिर्मिती (द.ल.यु.)	५७,१६०.४०	४८,५१३.६७	६१,८५६.२८	५२,४६८.७२	६१,६८७.२७	५८,३७४.५३

तक्ता क्र. २: आ.व. २०२२-२३, आ.व. २०२३-२४ आणि २०२४-२५ करीता जलविद्युत केंद्रांचे कामगिरी घटक (एकत्रित)

तपशील	आ.व. २०२२-२३		आ.व. २०२३-२४		आ.व. २०२४-२५	
	मंजूर केलेले	प्रत्यक्ष	मंजूर केलेले	प्रत्यक्ष	मंजूर केलेले	प्रत्यक्ष
एकूण वीजनिर्मिती (द.ल.यु)	४,४११.०३	४,३५९.२६	४,४३०.०४	३,६६७.८३	४,४३०.०४	३,९१४.५६
निव्वळ वीजनिर्मिती (द.ल.यु.)	४,३६३.५५	४,३२६.४८	४,३७८.१९	३,६३४.९८	४,३७९.०२	३,८६९.७२

तक्ता क्र. ३: आ.व. २०२२-२३ आणि आ.व. २०२३-२४ करिता अंतिम समायोजन व आ.व. २०२४-२५ करीता तात्पुरते समायोजन (रुपये कोटी)

अ. क्र.	तपशील	आ.व. २०२२-२३		आ.व. २०२३-२४		आ.व. २०२४-२५	
		मंजूर केलेले	मागणी केलेले	मंजूर केलेले	मागणी केलेले	मंजूर केलेले	मागणी केलेले
अ.	**खर्च**						
१	इंधन संबंधित खर्च	२२१०८.९९	१९,११३.९१	२४४८७.३६	१९,३२९.६३	२४५१७.८०	२२,६४३.५९
२	संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च	३,१११.५९	३,२०४.२१	३,२३८.५४	३,६२३.२१	३,३६१.८८	३,८६४.२७
३	माहिती तंत्रज्ञान विषयक खर्च		२१.४५		२८.८९		१९.६९
४	घसारा	२,०२८.५०	२,१०७.६९	२,१८४.९०	१,९८५.४८	२,४९१.१९	२,२२३.३४
५	कर्जाऊ भांडवलावरील व्याज	१,४५२.७७	१,३८६.५७	१,३४१.४२	१,२५५.८१	१,२९९.२०	१,१५६.५०
६	खेळत्या भांडवलावरील व्याज	७८९.६६	१,८२८.७०	८५८.६५	१,९९८.८७	८६९.८८	१,८५०.२८
७	इतर खर्च : जल आणि इतर खर्च	५६६.७८	६२०.४८	५६६.७८	७४९.३५	५६६.७८	७०८.१७
८	जलविद्युत प्रोत्साहन		१४.१८		०.४४		
९	जल भाडे पट्टी आकार	५४१.१९	५४१.२०	५३३.७६	५३१.७०	५२५.५५	५२३.५३
ब	**एकूण महसुलाची आवश्यकता**	**३०,६०७.४८**	**२८,८३८.३८**	**३३,२११.४१**	**२९,५०३.३८**	**३३,६३२.२८**	**३२,९८९.३८**
१०	भाग भांडवला वरील परतावा	१,६१७.४५	१,६३२.००	१,६७३.९०	१,६५६.६९	१,७८४.५३	१,७०८.०४
क	**एकूण महसुलाची आवश्यकता**	**३२,२२४.९४**	**३०,४७०.३८**	**३४,८८५.३१**	**३१,१६०.०६**	**३५,४१६.८१**	**३४,६९७.४२**
११	इंधन खर्च, संचलन आणि सुव्यवस्था खर्चाच्या कारणास्तव होणाऱ्या नफा/तोटयाची विभागणी		१,०४९.२८		६९९.१०		
१२	कर्जाच्या पुनर्वित्त खर्चाच्या कारणास्तव होणाऱ्या नफा / तोटयाची विभागणी	-	-	-	-	-	-
१३	वजा: वीज विक्री सोडून उत्पन्न	-२६०.२७	-६१.५३	-१३३.०७	-५८.५५	-१३३.०७	-५८.५५
१४	प्रमाणित उपलब्धता न गाठल्यामुळे वार्षिक स्थिर आकारातील घट	-९९३.१६	-१,६३९.८८	-६०१.२६	-१,०९७.७०	-६४०.१८	-६३६.७६
ड	**निव्वळ एकत्रित महसुलाची गरज**	**३०,९७१.५१**	**२९,८१८.३५**	**३४,१५०.९८**	**३०,६२२.९१**	**३४,६४३.५६**	**३४,००२.११**
इ	**वीज विक्री महसुलातून मिळालेले उत्पन्न**	**३२,००३.२३**	**२६,९७६.२०**	**३४,१५०.९८**	**२८,६३३.६९**	**३४,६४३.५६**	**३३,२७१.९४**
फ	**महसुलातील तफावत (वाढ / अतिरिक्त) = (ड-इ)**	**-१,०३१.७२**	**२,८४२.०४**	-	**१,९८९.२१**	-	**७३०.१७**
ग	**समायोजित नंतरचा महसूल**		**-१,०३१.७२**		-		
ह	**एकूण महसुलातील तफावत (वाढ /अतिरिक्त) = (फ-ग)**	**-१,०३१.७२**	**३,८७३.७६**	-	**१,९८९.२१**	-	**७३०.१७**

४. महानिर्मितीने मा. आयोगाकडे खालील बाबी च्या अनुषगाने महसुली तफावतीची वसूली करण्यास मंजूरी देण्याची विनंती केली आहे.

अ) भुसावळ संच क्र. ४ व ५ प्रकल्पासाठीची अंतिम परिसमापित नुकसान भरपाई (लीक्वीडेटेड डॅमेजेस) व "भविष्यात देय असलेल्या पण पार न पडलेल्या दायित्व (अनडिसचार्जड लायबिलिटी)" पैकी काही दायित्व निर्मूलन यंत्रणेचे सुधारित भांडवली खर्चाला मंजूरी.

ब) कोराडी संच क्र. ८,९ व १० प्रकल्पासाठीची अंतिम परिसमापित नुकसान भरपाई (लीक्वीडेटेड डॅमेजेस) व "भविष्यात देय असलेल्या पण पार न पडलेल्या दायित्व (अनडिसचार्जड लायबिलिटी)" पैकी काही दायित्व निर्मूलन यंत्रणेचे सुधारित भांडवली खर्चाला मंजूरी.

क) परळी संच क्र. ८ प्रकल्पासाठीचे "भविष्यात देय असलेल्या पण पार न पडलेल्या दायित्व (अनडिसचार्जड लायबिलिटी)" पैकी काही दायित्व निर्मूलन यंत्रणेचे सुधारित भांडवली खर्चाला मंजूरी.

ड) पुनर्विलोकन याचिका क्र. १३२/२०२३ वरील आदेशानुसार मंजूर बाबी.

इ) मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी आलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती.

५. महानिर्मितीने वर नमूद केलेले अंतिम समायोजन तपशील व इतर बाबी यानुसार एकत्रित महसुली तफावत रु. ७८७४.५१ कोटी ची मागणी केली आहे, ज्यामध्ये रु.११२०.९७ कोटी च्या येणे असलेल्या व्याजाचा (कॅरिंग कॉस्ट) समावेश आहे.

६. आ.व. २०२५-२६ ते ते आ.व. २०२९-३० साठी प्रस्तावित कामगिरी घटकांचा सारांश हा खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. ४: कामगिरी घटकांचा सारांश नियंत्रण कालावधी आ.व. २०२५-२६ ते आ.व. २०२९-३० करिता

तपशील	उपलब्धता %	सयंत्र भारांक %	महाग्रयकारी विजेचा वापर %	दुय्यम इंधनाचा वापर मि.ली./युनिट	उष्मांक दर किलो कॅ./युनिट
भुसावळ-३	८०	८०	१०.९६	१.४०	२,७८७
चंद्रपूर ३ ते ७	८०	८०	९.३८	१.००	२,६८८
खापरखेडा - १ ते ४	७५	७५	१०.४१	१.२०	२,६३०
कोराडी - ६	७५	७५	११.०१	२.८१	२,४५६
नाशिक	८०	८०	१०.७५	१.००	२,७५४
उरण★	४१	४१	३.१०	-	२,०३५
पारस - ३, ४	८५	८५	११.४५	०.५०	२,४१५
परळी - ६, ७	८५	८५	१०.४५	०.५०	२,४१५
खापरखेडा - ५	८५	८५	६.००	०.५०	२,३७५
भुसावळ - ४, ५	८५	८५	६.००	०.५०	२,३७५
कोराडी - ८,९,१०	८५	८५	६.००	०.५०	२,२३०
चंद्रपूर - ८, ९	८५	८५	६.००	०.५०	२,३७५
परळी - ८	८५	८५	९.३४	०.५०	२,४१५

७. आ.व. २०२५-२६ ते आ.व. २०२९-३० करिता याचिकेतील एकूण वार्षिक महसुलाचा सारांश खालील प्रमाणे.

तक्ता क्र. ५: महानिर्मिती कंपनीसाठी अंदाजित वार्षिक महसुलाची गरज (रुपये कोटी)

तपशील	आ.व. २०२५-२६	आ.व. २०२६-२७	आ.व. २०२७-२८	आ.व. २०२८-२९	आ.व. २०२९-३०
अस्थिर आकार					
इंधन खर्च इतर खर्चासहीत	२८,८६७.६२	३०,३११.६४	३१,८०१.१९	३२,५८२.६६	३३,५७७.६२
क्षमता आकार					
दुरुस्ती व देखभाल विषयक खर्च	३,८५६.११	४,०४२.१७	४,३००.५७	४,५०९.४४	४,७९२.९६
वेतन पुनर्रचना	३९६.८७	४४४.१६	४३२.२०	४५१.०३	४७०.६८
माहिती तंत्रज्ञान विषयक खर्च	२९.१८	६१.२७	५९.१७	६३.९१	८१.८२
इतर खर्च	२९५.४७	२९५.५९	२९५.७२	२९५.८५	२९५.९९
जल आकार	४०३.३५	४२४.२८	१,४००.५१	१,४४७.८३	१,४९४.५१
दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज आणि वित्त भार	१,११६.६८	१,०९९.१९	१,०५४.१८	९६४.१५	८५३.८३
वार्षिक विशेष भत्ता -जल विद्युत केंद्र	६७.०८	६७.९४	७१.०६	७१.०६	७१.०६
खेळत्या भांडवलावरील व्याज	१,३२०.६१	१,०८१.१६	१,१४०.५७	१,१७४.१५	१,२०७.१७
घसारा	२,३५९.७१	२,२२०.७३	२,२९५.७०	२,३७२.६९	२,२५९.३६
भाग भांडवलावरील परतावा	२,०१३.३१	२,१४९.७६	२,२६४.८८	२,३५४.६२	२,४२९.९१
लवचिकीकरण देखभाली करिता प्रशिक्षण खर्च	०.८०	२९.००	४.००	२९.००	३.२०
राख वापर खर्च	५३९.२५	५६९.४७	५७२.७३	५५९.०४	५९८.४८

तपशील	आ.व. २०२५-२६	आ.व. २०२६-२७	आ.व. २०२७-२८	आ.व. २०२८-२९	आ.व. २०२९-३०
वजा: वीज विक्री सोडून उत्पन्न	-५८.५५	-५८.५५	-५८.५५	-५८.५५	-५८.५५
एकूण वार्षिक क्षमता आकार	१२,३३९.८७	१२,३९६.१६	१३,८३२.७३	१४,२३४.२३	१४,४२०.४२
भाडेपट्टी आकार	५१५.४१	५२०.७०	५२०.०५	४९९.२०	४८९.६२
एकूण महसुलाची आवश्यकता	४१,७२२.९०	४३,२२८.५०	४६,१५३.९७	४७,३१६.०९	४८,४८७.६६

८) आ.व.२०२५-२६ ते आ.व. २०२९-३० करिता अंदाजित वार्षिक स्थिर आकार वजाते केंद्र वीज आकार मंजूरीकरिता चा सारांश खालील प्रमाणे.

तक्ता क्र. ६: अंदाजित केंद्रनिहाय अस्थिर आकार (रु./kWh)

तपशील	आ.व. २०२५-२६	आ.व. २०२६-२७	आ.व. २०२७-२८	आ.व. २०२८-२९	आ.व. २०२९-३०
भुसावळ - ३	५.३७	५.६४	५.९२	६.२२	६.५३
चंद्रपूर ३ ते ७	४.६१	४.८५	५.१८	५.४४	५.७०
खापरखेडा १ ते ४	४.५५	४.८०	५.००	५.१६	५.३८
कोराडी - ६	४.०२	४.१९	४.३६	४.८७	५.०७
नाशिक	५.५०	५.७८	६.०७	६.३७	६.६९
उरण	५.२३	५.२३	५.२३	५.२३	५.२३
पारस - ३ ते ४	४.०५	४.२८	४.४८	४.७१	४.९४
परळी - ६, ७	६.३४	६.८१	७.१२	७.४४	७.७७
खापरखेडा - ५	३.५४	३.७२	४.०२	४.२२	४.४२
भुसावळ - ४, ५	४.३९	४.६१	४.९६	५.२१	५.४७
कोराडी - ८,९,१०	३.५३	३.६८	३.९३	३.९१	३.७९
चंद्रपूर - ८, ९	३.८६	४.०४	४.२८	३.८८	३.९५
परळी - ८	६.२८	६.७४	६.९०	७.२०	७.५२

तक्ता क्र. ७: अंदाजित केंद्रनिहाय वार्षिक स्थिर आकार (रूपये कोटी)

तपशील	आ.व. २०२५-२६	आ.व. २०२६-२७	आ.व. २०२७-२८	आ.व. २०२८-२९	आ.व. २०२९-३०
भुसावळ - ३	२११.२८	२२७.३२	३२०.१३	३३०.३२	३४१.८२
चंद्रपूर - ३ ते ७	१,५२६.५५	१,६८१.८८	१,८६९.७९	१,९६०.१५	२,०४१.२५
खापरखेडा - १ ते ४	९५२.९६	९२३.५३	१,०७६.०७	१,१३५.४०	१,१७५.३५
कोराडी - ६	३४९.९४	३६२.५९	३९९.२३	४१३.५९	४२८.३१
नाशिक - ३ ते ५	५३७.६१	६००.०९	६४७.५१	६७५.९०	७०२.३८
उरण	२५८.६०	२५८.४७	२७८.४७	२९८.८७	३१८.८५
पारस - ३, ४	५७१.९१	५९४.१२	७३७.९९	७५६.०१	७७१.७६
परळी - ६, ७	६२६.२१	६५६.४८	६७६.८७	७१३.९६	७५०.३८
खापरखेडा ५	६५८.१७	६७९.१२	६६७.५४	६८४.१५	७००.७४
भुसावळ - ४, ५	१,१११.९३	९४४.९७	१,३५९.७९	१,३९९.६०	१,४४२.५२
कोराडी - ८, ९, १०	२,४३८.४३	२,४८६.४२	२,७८१.१४	२,७९५.१८	२,७५६.६७
चंद्रपूर - ८, ९	१,२५४.१३	१,२७९.४८	१,३१७.५६	१,३१८.९०	१,१४१.९६
परळी - ८	४४९.४५	४५०.८६	४६४.६५	४६७.७६	४६५.१८
लघु जल विद्युत केंद्र	२०८.८७	२२२.५३	२३८.८७	२५३.३५	२६६.०६
भिरा	१५.८८	१६.४४	१६.९०	१८.४४	१९.७२
कोयना	२०४.६४	२१४.८३	२२५.५३	२३६.७८	२८४.८१
तिल्लारी	२८.०८	२९.३६	३०.९०	३१.३३	३२.५७
एकूण (अ)	**११,४०४.६५**	**११,६३६.५०**	**१३,१०८.१२**	**१३,४८९.६९**	**१३,६४०.३१**
अतिरिक्त दावा					
वेतन सुधारणा	८१.४६	८५.०१	८८.७१	९२.५८	९६.६१
खेळत्या भांडवलावरील व्याज-व्याजाचे नुकसान	२८४.५२	१४.९१	-	-	-
माहिती तंत्रज्ञान विषयक खर्च	२९.१८	६१.२७	५९.१७	६३.९१	८१.८२
लवचिकीकरण देखभाली करिता प्रशिक्षण खर्च	०.८०	२९.००	४.००	२९.००	३.२०
राख वापर खर्च	५३९.२५	५६९.४७	५७२.७३	५५९.०४	५९८.४८
महानिर्मितीच्या स्तरावर एकूण मागीतलेले शुल्क (ब)	**९३५.२१**	**७५९.६६**	**७२४.६१**	**७४४.५३**	**७८०.११**
एकूण बेरीज (क=अ+ब)	**१२,३३९.८७**	**१२,३९६.१६**	**१३,८३२.७३**	**१४,२३४.२२**	**१४,४२०.४२**

९) खालील दस्तऐवजांच्या प्रती महानिर्मिती कंपनीच्या खालील कार्यालयात लेखी विनंती केल्यास मिळू शकतील.

अ) प्रस्तावाचा कार्यकारी सारांश (इंग्रजी किंवा मराठीत), विनामुल्य.

ब) याचिकेचा तपशीलवार दस्तावेज (इंग्रजी मध्ये), सीडी / पेन ड्राइव सहित (एकूण रु.१५०/- रोखीने अथवा **"Maharashtra State Power Generation Company Limited"** यांच्या नावाने देय होणाऱ्या धनाकर्षे द्वारे प्रदान केल्यास).

क) याचिकेचा तपशीलवार दस्तावेज (इंग्रजी मध्ये) (एकूण रु.१००/-) प्रदान केल्यास.

ड) याचिकेचा तपशीलवार दस्तावेज सीडी / पेन ड्राइव स्वरूपात (इंग्रजी मध्ये) (एकूण रु. ५०/-) प्रदान केल्यास

मुख्य कार्यालय: मुख्य अभियंता, नियामक आणि वाणिज्यिक विभाग, म.रा.वीज निर्मिती कंपनी मर्यादित, ३रा मजला, प्रा. अनंत कणेकर मार्ग, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

अन्य ठिकाणची कार्यालये:

१) मुख्य अभियंता, वायुविद्युत केंद्र, बोकडवीरा, उरण जिल्हा रायगड पिन नं. ४०० ७०२, एसटीडी कोड (०२२) फोन नं. २७२२२२८५

२) मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र उर्जा भवन, पोस्ट - उर्जा नगर जिल्हा चंद्रपूर पिन नं. ४ ४२४०४, एसटीडी कोड (०७१७२) फोन नं. २२०१५५-५९

३) मुख्य अभियंता, कोराडी औ.वि.केंद्र, कोराडी उर्जा भवन, प्रशासकीय इमारत, कोराडी नागपूर पिन नं. ४४११११, एसटीडी कोड (०७१०९) फोन नं. २६२१४१-४६

४) मुख्य अभियंता, खापरखेडा औ.वि.केंद्र पोस्ट - खापरखेडा, जिल्हा नागपूर पिन नं. ४४११०२, एसटीडी कोड (०७१२३) फोन नं. २६८१६७-७०

५) मुख्य अभियंता, परळी औ.वि.केंद्र परळी वैजनाथ जिल्हा बीड पिन नं. ४३९५२०, एसटीडी कोड (०२४४६) फोन नं. २२२३५७-६०

६) मुख्य अभियंता, भुसावळ औ.वि.केंद्र, दीपनगर, (भुसावळ), जिल्हा जळगाव पिन नं. ४२५३०७, एसटीडी कोड (०२५८२) फोन नं. २५००१२/८४

७) मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, प्रशासकीय इमारत, पोस्ट -एकलहरे -नाशिक पिन नं. ४२२१०५, एसटीडी कोड (०२५३) फोन नं. २८१०२९१-९९

८) मुख्य अभियंता, पारस औ.वि.केंद्र, विद्युत नगर, पारस, जिल्हा अकोला पिन नं. ४४४११९, एसटीडी कोड (०७२५४) फोन नं. २३४४६५-६६

९) अधिक्षक अभियंता (निर्मिती), लघु जलविद्युत मंडळ, ५वा मजला, प्रकाश भवन प्लॉट नं. १०६, सेनापती बापट मार्ग, पुणे पिन नं. ४११०१६, एसटीडी कोड (०२०) फोन नं. २५६३७६१०

१०) उप मुख्य अभियंता, (चाचणी, उपकरण योजना व नियंत्रण), विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर. पिन नं. ४४००१३, एसटीडी कोड (०७१२) फोन नं. २५९११५९.

१०) तपशीलवार याचिकेचा दस्तऐवज आणि कार्यकारी सारांश महानिर्मिती कंपनीच्या संकेत स्थळावर (**www.mahagenco.in → Navigation → Regulatory & Commercial → Regulator petitions**) उपलब्ध आहे, तसेच कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) आयोगाच्या वेबसाईटवर (**www.merc.gov.in**) विनामुल्य डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे.

११) महानिर्मिती कंपनीने या जाहीर सुचनेद्वारे उक्त याचीकेसंबंधात जनतेकडून सूचना आणि हरकती मागवाव्यात, असे मा. आयोगाने निर्देश दिले आहेत. या जाहीर सुचनेला प्रतिसाद देण्यासाठी ज्याना कोणाला आपल्या हरकती सूचना सादर कराव्याच्या असतील ते आपल्या लेखी हरकती / सुचना मराठी किंवा इंग्रजी भाषेत माननीय वीज नियामक आयोगाच्या संकेतस्थळावर **E-public consultation** या टॅबवर (**www.merc.gov.in/e-public consultation**) अपलोड करू शकतात. या सुविधेचा वापर करण्यास जर काही अडचण येत असल्यास संबंधितांनी माननीय वीज नियामक आयोगाच्या कार्यालयात ८९२२०७३१/३२ या संपर्क क्रमांकावर अथवा **e-hearing@merc.gov.in** ईमेल आय डी वर सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०६.०० वाजेच्या दरम्यान कामकाजाच्या दिवसांत संपर्क साधावा.

१२) ज्या व्यक्तीनी **E-public consultation** या टॅब वर हरकती / सूचना अपलोड केलेल्या असतील, त्यानी कोणतीही मुद्रित / छापील परत सादर करण्याची, आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीना electronic संपर्क साधने उपलब्ध नसतील त्यांनी आपल्या हरकती / सूचना छापील प्रतीत, **"माननीय सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४००००५ किंवा फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६ ई-मेल mercindia@merc.gov.in"** या पत्त्यावर दिनांक : **३ जानेवारी**, २०२५ पर्यंत मिळतील अशा बेताने व **प्रमन्य कोटेचा, मुख्य अभियंता, नियामक आणि वाणिज्यिक विभाग, महानिर्मिती (महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी लिमिटेड), ३रा मजला, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१), ई-मेल rcgen@mahagenco.in** यांना प्रत दिलयाच्या पुराव्यासहित आणि प्रेषकाचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता व असल्यास ई-मेल पत्ता यासहित पाठवाव्यात. दिनांक ३ जानेवारी २०२५ ला संध्याकाळी ५ वाजेनंतर प्राप्त झालेल्या हरकती / सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच वर नमूद केलेल्या माध्यमाव्यतीरिक्त इतर कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या हरकती / सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१३) दिनांक **३ जानेवारी**, २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती / सूचना / अभिप्राय यांना महानिर्मिती कंपनीकडून तीन दिवसांत परंतु दिनांक **६ जानेवारी २०२५** पूर्वी उत्तरे देण्यात येतील. कंपनीतर्फे देण्यात आलेल्या उत्ताराबद्दल आक्षेप, त्याची पत्युत्तरे किंवा उत्तरे जाहीर सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात दिनांक **११ जानेवारी**, २०२५ पर्यंत दाखल करता येऊ शकतात.

१४) जर प्रेषक / हरकतदार, ज्याने वरील (११) नुसार हरकती / सूचना सादर केल्या आहेत, यास आयोगापुढील जाहीर सुनावणीस व्यक्तिश: उपस्थित राहण्याची व वोलण्याची इच्छा असल्यास त्याने ते स्पष्टपणे हरकती / सूचनेमध्ये नमूद करावे. यासाठी, वैध ई मेल आय डी आणि भ्रमणध्वनि क्रमांक सादर करणे अनिवार्य आहे. मा. आयोग, त्याच्या तारतम्यानुसार **दि. ८ जानेवारी, २०२५**, रोजी **Video Conferencing** द्वारे **सकाळी १०.३० वाजता** होणाऱ्या ई-जाहीर सुनावणीस उपस्थित राहण्याची व वोलण्याची संधी देऊ शकतो व त्याकरिता वेगळी सूचना दिली जाणार नाही.

१५) ई-जाहीर सुनावणीत सहभागी होणाऱ्या सर्वांनी मा. आयोगाद्वारे दि. १४ नोवेंबर २०२२ रोजी जाहीर केलेल्या **"मा. आयोगासमोरील ई-सुनावणीची प्रक्रिया व त्यादरम्यान पाळावयाचे संकेत"** यासंदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

सही/-
प्रसन्न कोटेचा
मुख्य अभियंता (नियामक व वाणिज्यिक विभाग)
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

ठिकाण : मुंबई
दिनांक : १२ डिसेंबर, २०२४